International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# ग्रामपंचायतीच्या प्रशासनात ई -गव्हर्नन्सची( ई -प्रशासन) भूमिका:एक अभ्यास

**संतोष सुरेश पाटील**

*संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

*Corresponding Author – संतोष सुरेश पाटील*

**DOI - 10.5281/zenodo.18491468**

***सारांश:***

*माहिती व संवाद तंत्रज्ञानाच्या (ICT) वेगवान प्रगतीमुळे शासन व्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आले आहेत.ई -गव्हर्नन्सच्या माध्यमातून,शासन सेवा अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम व नागरिक केंद्रित झाल्या आहेत. ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थांचा कणा असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये ई गव्हर्नन्स चा अवलंब प्रशासन सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरत आहे. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये ग्रामपंचायतीच्या प्रशासनात ई गव्हर्नन्सची भूमिका आणि फायदे, तसेच त्याच्या मर्यादा व परिणामांचा अभ्यास करून ,ग्रामीण भागातील घटकावर झालेला सकारात्मक परिणाम आणि शस्वत विकासाची संकल्पना प्रत्यक्षात साकार होण्यास ई गव्हर्नन्स कशा प्रकारे भूमिका बजावतो आहे याचा अभ्यास केला आहे. भारतीय राज्य घटनेने मांडलेली सु शासन व्यवस्था अस्तित्वात येण्यासाठी ई गव्हर्नन्स महत्त्वाची भूमिका बजावतो.*

***किवर्ड्स: ई -गव्हर्नन्स, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, प्रशासन पारदर्शकता.***

**प्रस्तावना:**

भारतात लोकशाहीचे मुळे ग्रामीण पातळीवर रुजविण्यासाठी ग्रामपंचायत व्यवस्था अस्तित्वात आली आहे भारताच्या लोकशाही व्यवस्थेत ग्रामपंचायत ही तळागाळातील शासन संस्था आहे. ग्रामीण विकास सेवा, वितरण व लोकसहभाग यामध्ये ग्रामपंचायतची भूमिका, अत्यंत महत्त्वाची आहे. पारंपारिक प्रशासन पद्धती मधील विलंब,अपारदर्शकता, व मनुष्यबळाच्या मर्यादा,दूर करण्यासाठी ई गव्हर्नन्स प्रभावी साधन ठरत आहे. भारतातील लोकशाही व्यवस्थेचा पाया स्थानिक स्वराज्य संस्था वर आधारित आहे.ग्रामपंचायत ही ग्रामीण प्रशासनाची सर्वात खालची पण अत्यंत महत्त्वाची पायरी आहे.ग्रामीण विकास, मूलभूत सुविधा, सामाजिक न्याय आणि लोकसहभाग यांची अंमलबजावणी ग्रामपंचायत मार्फत केली जाते. मात्र पारंपारिक प्रशासन पद्धतीमध्ये विलंब,अपारदर्शकता,कागदपत्रे कामकाज,आणि मनुष्यबळाची मर्यादा, यासारख्या अडचणी आढळतात. या पार्श्वभूमीवर ई -गव्हर्नन्स ही आधुनिक प्रशासनाची प्रभावी संकल्पना म्हणून पुढे आली आहे.

**उद्दिष्टे:**

१) ग्रामपंचायतींच्या प्रशासनात ई गव्हर्नन्सची भूमिका अभ्यासणे.

२) इ गव्हर्नन्स मुळे ग्रामपंचायत प्रशासनात झालेल्या बदलांचा आढावा घेणे.

३) इ गव्हर्नर चे फायदे व आव्हाने विश्लेषित करणे.

४) ग्रामीण विकासात गव्हर्नर्सचे योगदान स्पष्ट करणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत संशोधन पेपर साठी वृत्तपत्रे, पुस्तके,विविध लेख,इंटरनेटवरील उपलब्ध माहिती, इत्यादी दुय्यम प्रकारचे साहित्य वापरून सामाजिक दृष्टिकोनातून या विषयाचा अभ्यास केला आहे.

**ई - गव्हर्नन्स संकल्पना:**

ई -गव्हर्नन्स म्हणजे माहिती व संवाद तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करून शासनाच्या प्रशासनिक प्रक्रिया, सेवा वितरण आणि निर्णय प्रक्रिया, अधिक जलद, पारदर्शक, कार्यक्षम व नागरिक केंद्री बनवण्याची संकल्पना म्हणजे इ गव्हर्नन्स होय.संगणक, इंटरनेट मोबाईल ॲप, व डिजिटल प्लॅटफॉर्मच्या साह्याने सरकारी कामकाज व सेवा नागरिकापर्यंत पोहोचवण्याची आधुनिक प्रशासन प्रणाली म्हणजे इ गव्हर्नन्स होय.पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढवणे, सेवा वितरण सोपी जलद करणे, वेळेची व खर्चाची बचत करणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे,नागरिक सहभाग वाढवणे ही उद्दिष्टे समोर ठेवून, ई -गव्हर्नन्स ही संकल्पना सरकारने सुरू केली आहे.ई गव्हर्नन्स चे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.१)G to C (सरकार ते नागरिक) यामध्ये नागरिकांना सेवा देणे उदाहरणात जन्ममृत्यू नोंद कर भरणा इत्यादी.२)G to G (सरकार ते सरकार) यामध्ये वेगवेगळ्या शासकीय विभागात समन्वय साधने होय.३)G to B(सरकार ते व्यवसायिक) यामध्ये व्यवसायाशी संबंधित सेवेंचा समावेश होतो.४)G to E (सरकार ते नोकर व्यवस्था) यामध्ये सरकार आणि नोकरवर्ग यांच्यातील सेवांचा सहभाग असतो.

**अ) ई-गव्हर्नन्सची ग्रामपंचायतच्या विविध घटकातील भूमिका:**

**१) प्रशासनिक भूमिका:**

ई -गव्हर्नन्स मुळे ग्रामपंचायतच्या दैनंदिन प्रशासनात मूलभूत व सकारात्मक बदल घडून आले आहेत. पारंपारिक कागदपत्रे पद्धती ऐवजी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाल्यामुळे प्रशासन अधिक शिस्तबद्ध,पारदर्शक व कार्यक्षम बनले आहे. नोंदी व पत्रव्यवहार डिजिटल स्वरूपात साठवले जात आहेत.ग्रामपंचायतीचे ठराव संगणीकृत नोंदीमुळे प्रशासकीय कामकाजात अचूकता वाढली आहे .तसेच कागदपत्रांची सुरक्षितता राखली जात आहे. आवश्यक असणारी माहिती अल्प वेळेत उपलब्ध होत आहे. ई गव्हर्नन्स मुळे कामातील विलंब कमी होऊन प्रशासकीय प्रक्रियेचा वेग वाढत आहे. नागरिकांना ग्रामपंचायतींच्या निर्णय प्रक्रियेची माहिती सहजपणे मिळत आहे. त्यामुळे लोक सहभाग वाढून लोकशाही मूल्ये अधिक बळकट होत आहेत. ग्रामपंचायतचे प्रशासन तसेच ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी या सर्वांवर उत्तरदायित्वाची भावना वाढीस लागली आहे त्यामुळे ग्रामपंचायत कार्यक्षम व लोकाभिमुख बनत चालली आहेत.

**२)आर्थिक भूमिका:**

ई -गव्हर्नन्स मुळे ग्रामपंचायत प्रशासनात लक्षणीय सुधारणा झालेली दिसून येत आहे. पारंपारिक पद्धतीतील हस्तलिखित नोंदी रोख व्यवहार आणि विलंबित लेखापरीक्षण या ऐवजी संगणीकृत आधुनिक PFMS आर्थिक प्रणाली स्वीकारली केली आहे.लेखा प्रणाली ग्रामपंचायत मध्ये ई अकाउंटिंग लागू झाल्यामुळे उत्पन्न व खर्चाच्या नोंदी अचूक वेळेत केल्या जात आहेत. पाणीपट्टी,मालमत्ता कर, स्थानिक करांचे ऑनलाईन भरणा करणे शक्य झाल्याने, महसूल संकलनात वाढ झाली आहे. तसेच निधीचा गैरवापर रोखण्यास मदत झाली आहे. ई

गव्हर्नन्सच्या माध्यमातून खर्च केल्यामुळे ग्रामपंचायतींना थेट मिळणारा निधी,लेखापरीक्षण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि काटेकोर झाली आहे.यातून ग्रामपंचायतींना आर्थिक शिस्त लागली आहे. परिणामी ग्रामपंचायतचे आर्थिक प्रशासन अधिक नियोजनबद्ध व विश्वासार्ह बनले आहे.

**३) सेवा वितरणातील भूमिका:**

ई -गव्हर्नन्स मुळे ग्रामपंचायत द्वारे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली आहे. पारंपारिक हस्तलिखत रजिस्टर नोंद पद्धती ही वेळ खाऊ व क्लिष्ट स्वरूपाची असणारी सेवा होती .सध्या ई गव्हर्नन्स मुळे विवाह नोंदणी, जन्म-मृत्यू नोंद प्रक्रिया, मालमत्ता व पाणीपट्टी कर भरणा यासारख्या सेवा ऑनलाईन उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना प्रमाणपत्रे सुलभ व जलदरित्या प्राप्त होत आहेत.नागरिकांना ग्रामपंचायत कार्यालयात वारंवार भेट देण्याची गरज उरलेली नाही. त्यामुळे नागरिकांचा वेळ व आर्थिक खर्चाची बचत होत आहे.CSC म्हणजे कॉमन सर्विस सेंटर च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना डिजिटल सेवा मिळत असल्याने सेवा वितरण अधिक लोकाभिमुख,सर्व समावेशक झाली आहे.

**४) सामाजिक भूमिका:**

ई -गव्हर्नन्स चा ग्रामपंचायतीच्या सामाजिक भूमिकेवरही सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. विविध सामाजिक कल्याण योजनांची माहिती डिजिटल माध्यमातून नागरिकापर्यंत पोहोचत असल्याने सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे दिला जात आहे.प्रधानमंत्री आवास योजना, महिला व बालकल्याण योजना,स्वच्छ भारत अभियान, वृद्ध व दिव्यांगांसाठी असणाऱ्या योजना, अपंग कल्याण योजना,यासारख्या उपक्रमात DBT (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर):सारख्या उपक्रमामुळे आर्थिक लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत आहे. यामुळे मध्यस्थी व वशिलाबाजी यांचे प्रमाण कमी होऊन भ्रष्टाचार कमी झाला आहे. ग्रामीण भागातील डिजिटल साक्षरता वाढून महिला, युवक व वंचित घटक यांचा प्रशासनातील सहभाग वाढत आहे, परिणामी सामाजिक समावेशकता व ग्रामीण विकासाला चालना मिळत आहे.

**५) तांत्रिक व व्यवस्थापकीय भूमिका:**

विविध प्रकारचे सॉफ्टवेअर आणि डेटा व्यवस्थापन इंटरनेट संगणक प्रणाली यांचा प्रभावी वापर करणे ही ग्रामपंचायतींची पर्यायाने ग्रामसेवक व कर्मचाऱ्यांची जबाबदारी ठरत आहे. सायबर धोके टाळण्यासाठी योग्य डेटा सुरक्षित ची काळजी घेणे डिजिटल प्रशिक्षण, तसेच आवश्यक उपाययोजना करणे, स्थानिक भाषेत सेवा उपलब्ध करून देणे हे व्यवस्थापकीदृष्ट्या महत्त्वाची बाब आहे.परिणामी इ गव्हर्नन्सची अंमलबजावणी अधिक प्रभावी व टिकाऊ ठरते.

**ब) ई-गव्हर्नन्सचे ग्रामपंचायतीवरील परिणाम:**

ई गव्हर्नन्सच्या अंमलबजावणीमुळे ग्रामपंचायतच्या कार्यपद्धतीत लक्षणीय सुधारणा झालेली दिसून येते.आर्थिक व्यवस्थापन,आणि नागरी सेवा वितरण प्रशासन सहभाग, असे सकारात्मक परिणाम स्पष्टपणे जाणवतात.

**१) प्रशासन अधिक कार्यक्षम:**

ई - गव्हर्नन्स मुळे ग्रामपंचायतच्या प्रशासनात कार्यक्षमता वाढली आहे.संगणीकृत नोंदी,ऑनलाईन पत्रव्यवहार आणि डिजिटल अहवाल प्रणालीमुळे कामकाजात शिस्त आणि वेग आला आहे. दैनंदिन प्रशासन अधिक सुटसुटीत आणि परिणामकारक बनले आहे.

**२) भ्रष्टाचारात घट:**

ई गव्हर्नन्स मुळे आर्थिक व्यवहारात अंमलबजावणी आणि प्रशासकीय निर्णयामुळे डिजिटल

स्वरूपात नोंदवले जात असल्याने पारदर्शकता अधिक वाढली आहे. सार्वजनिक स्वरूपात सर्व माहिती उपलब्ध झाल्यामुळे गैरव्यवहारास आळा बसला आहे.ऑनलाइन निधी वितरण व ऑनलाइन प्रणालीमुळे आर्थिक लेखा प्रणालीत अनियमितता कमी झाल्याचे दिसून येते.

**३) सेवा वितरण जलद:**

जन्म मृत्यू नोंदणी, कर भरणा,विविध दाखले यासारख्या सेवा ऑनलाईन उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना सेवा मिळण्याचा कालावधी कमी झाला आहे.पारंपारिक पद्धतीतील कागदोपत्री प्रक्रिया टाळून सेवा वितरण अधिक जलद व सुलभ झाले आहे. त्यामुळे सेवा लोकाभिमुख झाल्या आहेत.

**४) नागरिकांचा विश्वास वाढला:**

ग्रामपंचायतच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता व उत्तरदायित वाढल्याने नागरिकांचा प्रशासनावर विश्वास दृढ झाला आहे. ग्राम विकास कामांची माहिती व आर्थिक तपशील ऑनलाईन उपलब्ध असल्यामुळे नागरिकांना अधिक विश्वास निर्माण होऊन, लोकशाही निर्णय प्रक्रिये बाबत विश्वास वाटू लागल्याने लोकशाही बळकट होण्यास मदत होत आहे.

**क) ई गव्हर्नन्स चे फायदे:**

इ गव्हर्नन्स ही आधुनिक प्रशासनाची संकल्पना असून ग्रामपंचायतच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडून आले आहेत.आर्थिक व्यवस्थापन आणि सामाजिक विकास, सेवा वितरण, प्रशासन या सर्व क्षेत्रात बदल घडून आले आहेत.. ई -गव्हर्नन्स मुळे ग्रामपंचायतीच्या प्रशासनात, कार्यक्षमतेत लक्षणीय रित्या वाढ झाली आहे .ई-फायलिंग आणि डिजिटल अहवाल, ऑनलाईन पत्र व्यवहार यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक वेगवान झाले आहे. ई -गव्हर्नन्स मुळे विविध योजनांची अंमलबजावणी, ग्रामपंचायत आर्थिक व्यवहार,नागरिकांना सहज उपलब्ध होत असल्याने प्रशासनात पारदर्शकता वाढली आहे. तसेच लोकप्रतिनिधी व कर्मचारी यांच्यावर उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ झाली आहे. ई गव्हर्नन्स- वापरामुळे ग्रामपंचायत कर्मचारी व नागरी यांच्यात डिजिटल तंत्रज्ञानाबाबत जागरूकता वाढत आहे .इंटरनेटवर, मोबाईल आधारित सेवांचा वापर वाढल्याने ग्रामीण भागात डिजिटल साक्षरतेत लक्षणीय वाढ झाली आहे.

**ड) ई गव्हर्नन्स समोरील आव्हाने:**

ई गव्हर्नन्स ही आधुनिक प्रशासनाची प्रभावी संकल्पना असली तरी तिच्या यशस्वी अंमलबजावणी समोर विविध आव्हाने उभी आहेत. विशेषतः ग्रामपंचायतींच्या संदर्भात ही आव्हाने अधिक तीव्रतेने जाणवतात. ग्रामीण व शहरी भागातील तांत्रिक सुविधा,इंटरनेटची उपलब्धता, आणि डिजिटल साक्षरता यामध्ये मोठी तफावत आढळून येते.त्यामुळे ग्रामीण भागात डिजिटल दरी निर्माण झाली आहे. ई गव्हर्नन्स च्या- समान व सर्वसमावेशक अंमलबजावणीस डिजिटल साक्षरता अडथळा ठरत आहे. आधुनिक सेवा, कमी गतिमानता आणि मर्यादित साधन सुविधामुळे ग्रामीण भागात डिजिटल दरी निर्माण झाली आहे.तसेच ई गव्हर्नन्स- च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित व तांत्रिक दृष्ट्या सक्षम मनुष्यबळांची आवश्यकता असते .सॉफ्टवेअर वापर व डेटा व्यवस्थापनात प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याने प्रणालीचा योग्य वापर होत नाही. बहुते ई गव्हर्नन्स सॉफ्टवेअर ही इंग्रजी भाषेत उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना तसेच काही वयस्कर कर्मचाऱ्यांना त्यांचा वापर करणे कठीण जाते. अनुकूल भाषेत सॉफ्टवेअरची कमतरता असल्याने वापरकर्त्यांचा सहभाग कमी दिसून येतो, हे एक मोठे आव्हान आहे. पारंपरिक प्रशासन पद्धतीची सवय झालेल्या कर्मचारी व लोकप्रतिनिधीमध्ये बदल स्वीकारण्यास विरोध दिसून येतो. पारदर्शकता आणि नवीन तंत्रज्ञाचा वापर ही

मानसिकता व संस्थात्मक पारदर्शकता आणि नवीन तंत्र वापर उत्तरदायित्व यामुळे काही कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी या घटकांना अस्वस्थता वाटते आणि ई -गव्ृहर्नन्सच्या प्रभावी अंमलबजावणीस अडथळा ठरतो.

**इ) ई -गव्हर्नन्सचे ग्रामीण विकासातील योगदान:**

ई -गव्हर्नन्सच्या डिजिटल तंत्रज्ञानामुळे आणि अंमलबजावणीत ग्रामीण भारतातील प्रशासन वितरण व आर्थिक विकास प्रक्रियेत मूलभूत बदल झाले आहेत.शासन व ग्रामीण नागरिक यांच्यातील अंतर कमी झाले असून विकास अधिक समावेशक बनला आहे. ई- ग्राम स्वराज्य या प्लॅटफॉर्मवर देशातील सुमारे दोन लाख साठ हजार हून अधिक ग्रामपंचायती एकमेकांना जोडल्या गेल्या आहेत शंभर टक्के लेखी नोंदी व अहवाल ठराव डिजिटल नोंदी कडे वाटचाल करत आहेत सर्व ग्रामपंचायत एकमेकांना जोडल्या गेल्या आहेत. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर( DBT ) मुळे दरवर्षी सुमारे एक ते दोन लाख कोटींची बचत म्हणजे आर्थिक अपव्यय कमी झाल्याचे अहवालातून नमूद झाले आहे.तसेच मनरेगा अंतर्गत डिजिटल जॉब कार्ड ऑनलाइन हजेरी, व थेट वेतन हस्तांतरणामुळे दरवर्षी पाच ते सहा कोटी ग्रामीण कुटुंबांना रोजगार प्राप्त झाला आहे .PMGSY अंतर्गत सहा लाख किलोमीटर अधिक ग्रामीण रस्ते GIS ऑनलाईन मॉनिटरींग मुळे गुणवत्तेत सुधारणा झाली आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागात 95 टक्के पर्यंत स्वच्छतागृह निर्माण झाली आहेत.जनधन योजनेत तीस कोटी ग्रामीण बँक खाते काढली गेली आहेत .यूपीआय(UPI)डिजिटल पेमेंटचा वापर वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारली आहे.ऑनलाइन तक्रार निवारण प्रणालीमुळे ग्रामसभा नोंदी व माहिती उपलब्ध झाले आहेत , त्यामुळे ग्रामीण नागरिकांचा सहभाग वाढला आहे.CSC प्रशिक्षण कार्यक्रमामुळे लाखो ग्रामीण नागरिकांना डिजिटल सेवांचा वापर करता येऊ लागला आहे. ई गव्हर्नन्स ने ग्रामीण विकासाला वेग दिला असून पायाभूत सुविधा, रोजगार,आर्थिक पारदर्शकता व प्रशासकीय कार्यक्षमता यामध्ये वाढ झाली आहे. सामाजिक सेवांमध्ये ठोस सुधारणा झाली आहे. पायाभूत सुविधा आणि मानवी संसाधन विकास यांच्या साह्याने ई गव्हर्नन्स भारताच्या समावेशक व शाश्वत विकासाचे प्रभावी साधन ठरत आहे.

**निष्कर्ष:**

ई गव्हर्नन्स हे ग्रामपंचायतीच्या प्रशासनातील सुधारणा घडवून आणणारे प्रभावी साधन आहे. प्रशिक्षण व जनजागृतीच्या माध्यमातून योग्य पायाभूत सुविधा, ग्रामपंचायतचे प्रशासन अधिक प्रभावीपणे सहभाग घेऊ शकते. ई गव्हर्नन्समुळे ग्रामीण विकासाला वेग दिला आहे .सामाजिक सेवा ,पायाभूत सुविधा ,आर्थिक सुविधा ,प्रशासनिक कामातील वेग इत्यादी सेवांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली आहे. रोजगार,पारदर्शकता, डिजिटल सेवा,पायाभूत सुविधा मानवी संसाधन विकास,योग्य धोरणांची अंमलबजावणी यासारख्या सुविधा ई गव्हर्नन्स मुळे- ग्रामीण भारताच्या सर्व समावेशक व शाश्वत विकास चे प्रभावी साधन ठरत आहे . तथापि ग्रामीण भागातील डिजिटल साक्षरतेची दरी ,प्रशिक्षित मनुष्यबळांचा अभाव ,तांत्रिक अडचणी व सायबर सुरक्षितेचे धोके ही ई -गव्हर्नन्स प्रभावी अंमलबजावणी समोरची आव्हाने उभी आहेत. ही आव्हाने दूर करण्यासाठी योग्य धोरणांचे नियोजन,मजबूत तांत्रिक पायाभूत सुविधा आणि मानवी संसाधनाचा सर्वांगीण विकास आवश्यक आहे. एकूणच योग्य धोरण, सक्षम पायाभूत सुविधा व प्रभावी मानवी संसाधन विकास यांच्या साह्याने ई गव्हर्नन्स-भारताच्या शाश्वत विकासाचे आणि सु-शासन व्यवस्थेचे प्रभावी साधन ठरत आहे.

**संदर्भसूची:**


१) पाटील. बी. बी.(२०१८).ई गव्हर्नन्स-: संकल्पना व अंमलबावणी, डायमंड प्रकाशन, पुणे.

२) जाधव अशोक.(२०१७). ई प्रशासन आणि लोकशाही. प्रशांत प्रकाशन, जळगाव.

३) Bhatnagar,S.(2014).E -Governance: From vision to implementation. Sage publication.

४) National e-Governance Plan (NeGP)– Government of India.

५) e-Panchayat Mission Mode Project Report– Ministry of Panchayati Raj.

६) E-Governance in Rural India – Report– NITI Aayog.